# ग्राम विकास विभाग

**ग्राम विकास विभागाच्या** अखत्यारीतील नगर परिषद, जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्राम विकास लोकसेवकांवर लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत **सन २०१३ व सन – २०१४** या कालावधीमध्ये सापळा, अपसंपदा व अन्यभ्रष्टाचार अन्वये दाखल केलेल्या कार्यवाहीचा अहवाल.




| सन | सापळा | अपसंपदा | अन्य भ्रष्टाचार | एकुण |
|---|---|---|---|---|
| २०१३ | ६९ | १ | ० | ७० |
| २०१४ | १६६ | ३ | ३ | १७२ |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत सन २०१३ व सन २०१४ या कालावधीमध्ये केलेल्या सापळा कार्यवाहीचा परिक्षेत्र निहाय अहवाल.




| सन | परिक्षेत्र | | | | | | | | एकूण सापळा प्रकरणे | तफावत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुंबई | ठाणे | पुणे | नाशिक | नागपूर | अमरावती | औरंगाबाद | नांदेड | | |
| २०१३ | – | ६ | ७ | ८ | ७ | १५ | १४ | १२ | **६९** | **९७** |
| २०१४ | – | १५ | १८ | २६ | २४ | २७ | २५ | ३१ | **१६६** | **जास्त** |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत सन २०१३ व २०१४ मध्ये केलेल्या सापळा कारवाईत गुंतलेले ग्रामविकास विभागातील आरोपी लोकसेवक वर्ग निहाय.




| सन | वर्ग-१ | वर्ग-२ | वर्ग-३ | वर्ग-४ | इतर लोकसेवक | खाजगी व्यक्ती | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१३ | ८ | ११ | ४७ | ५ | १३ | ४ | ८८ |
| २०१४ | ७ | २७ | १३० | ५ | ३१ | १७ | २१७ |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत सन २०१३ व २०१४ मध्ये केलेल्या अपसंपदा प्रकरणामध्ये गुंतलेले ग्रामविकास विभागातील आरोपी लोकसेवक वर्ग निहाय




| सन | वर्ग-१ | वर्ग-२ | वर्ग-३ | वर्ग-४ | इतर लोकसेवक | खाजगी व्यक्ती | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१३ | - | - | - | - | १ | १ | २ |
| २०१४ | २ | - | - | - | १ | - | ३ |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत सन २०१३ व २०१४ मध्ये केलेल्या अन्य भ्रष्टाचार प्रकरणात कारवाई केलेले आरोपी लोकसेवक वर्ग निहाय




| सन | वर्ग-१ | वर्ग-२ | वर्ग-३ | वर्ग-४ | इतर लोकसेवक | खाजगी व्यक्ती | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१३ | - | - | - | - | - | - | - |
| २०१४ | - | ४ | ३ | - | - | - | ७ |

वरील भ्रष्टाचार प्रकरणे ही संबधीत लोकसवेकाने खालील शासकीय कार्यवाही करताना केल्याचे आढळते.:

१. पद्दोन्नतीचे प्रस्ताव शिफारस करून अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे पाठविण्याकरीता.

२. शासनातर्फे राबविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ मंजूर करून देण्याकरीता.

३. जागांच्या नोंदणीकरीता.

४. शासकीय अनुदानांचा लाभ देण्याकरीता.

५. मृताचे नंतर वारसाचे नांव फेरफार करण्यासाठी.

६. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत सिंचन विहिरीचे ई मस्टरमध्ये अभिप्राय नोंदवून स्वाक्षरी करणे व त्याकामाची मोजमाप पुस्तीकेत नोंद घेवून बील पाठविण्यासाठी.

७. एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कामकाज अंतर्गत मंजूर घरकुलाचे अनुदानासाठी पाठविलेल्या प्रस्तावात नांवात झालेला बदल दुरुस्ती करण्यासाठी.

८. घरकुलाचे बील काढण्यासाठी.

९. रोजगार हमी योजनेअंतर्गत रस्ता, विहिर व पाणलोट क्षेत्र इ. कामासाठी लावलेल्या मजुरांचे मेजरमेंट बुक करुन बिलाची व मानधनाची रक्कम काढण्यासाठी.

१०. खरेदी केलेल्या मोकळया जामिनीची नोंद ग्रामपंचायतीच्या अभिलेखावर घेवून नमूना क्रमांक ८ चा उतारा देण्यासाठी.

११. गावातील तंटामुक्ती पुरस्कारांचे रक्कमेबाबतची तक्रारीची चौकशी निरंक करण्यासाठी.

१२. अंगणवाडी बांधकामाची चौकशी निरंक धरुन बांधकामाचे मोजमाप (एम.बी.) करण्याचे आदेश देण्यासाठी.

१३. नवीन बांधलेल्या घराला घरपट्टी सुरु करुन नाहरकत प्रमाणपत्र देण्यासाठी.

१४. घराची नोंद ग्रामपंचायत कार्यालयात घेण्यासाठी.

१५. आंतरजातीय विवाह केलेल्या नवीन जोडप्यांना महाराष्ट्र शासनाकडून देण्यात येणाऱ्या अनुदानाचा चेक देण्यासाठी.

१६. मंजूर रजेच्या वेतनाचे बिलाच्या धनादेशावर सही करण्यासाठी.

१७. मालमत्तेवर बॅक कर्ज बोजाची नोंद ग्रामपंचायतीचे ८-अ रेकॉर्डला घेवून सत्यप्रती देण्यासाठी.

१८. अनाधिकृत बांधकामाची परवानगी देण्याबाबत.